# आगामी खरीप हंगामात बीजप्रक्रिया करूनच करा पेरणी

डॉ. एस. एस. विटनोर प्रा. व्ही. एम. भराडे डॉ. डी. जी. इंगोले
कृषी वनस्पतीशास्त्र विभाग
छत्रपती शाहू महाराज, कृषी महाविद्यालय, कांचनवाडी, औरंगाबाद



पेरणीपूर्वी एक विशिष्ट उद्दिष्ट ठेवून विशेषत: अन्नद्रव्य उपलब्धतेत वाढ करणे, पिकामध्ये कीड व रोग प्रतिबंध करणे यासारखा महत्त्वाचा उद्देश ठेवून केलेली जैविक खताची, जैविक बुरशीनाशकाची किंवा रासायनिक बुरशीनाशकाची किंवा किटकनाशकाची बियाण्याला शिफारशीप्रमाणे पेरणीपूर्वी केलेली प्रक्रिया म्हणजे बीजप्रक्रिया होय.

### पिकात बीज प्रक्रिया केल्यामुळे कोणते महत्त्वाचे फायदे होतात?

- द्विदल धान्याच्या पिकात उदाहरणार्थ तुर उडीद मुग सोयाबीन इत्यादी पिकात संबंधित पिकात शिफारशीत रायझोबियम या जैविक खताची बीजप्रक्रिया केल्यास हवेतील नत्र स्थिर होतो व नत्राची उपलब्धता होते व रासायनिक खतातून द्यावयाच्या नत्राच्या मात्रेत कपात करता येते.
- ज्वारी, मका, कपाशी किंवा इतर एकदल पिकात अॅझटोबॅक्टर या सारख्या जिवाणू संवर्धकाच्या बीजप्रक्रियेमुळे असहजीवपद्धतीने जमिनीतील नत्र स्थिरीकरण होऊन नत्राची उपलब्धता होते व नत्राच्या रासायनिक खताच्या रूपा द्यावयाच्या मात्रेत कपात करता येते पीएसबी या जिवाणू संवर्धकाच्या बीजप्रक्रियेमुळे जमिनीतील रासायनिक खताच्या रूपा दिलेला स्फुरद विरघळून पिकाला मिळवून देण्याचे काम केलं जातं.
- शिफारशीप्रमाणे व लेबल क्लेम प्रमाणे प्रत्येक पिकात संबंधित रासायनिक बुरशीनाशक व कीटकनाशक यांची प्रक्रिया केली तर शिफारशीप्रमाणे संबंधित पिकातील संबंधित कीड रोगाचा प्रतिबंध मिळतो व नंतर होणारा रासायनिक कीडनाशकाचा वापर कमी होऊन उत्पादन खर्चात कपात होते व पर्यावरण निष्ठ पीक संरक्षण करता येते. बऱ्याच रोगात बऱ्याच पिकात जमिनीतून प्रादुर्भाव करणाऱ्या बुरशीजन्य रोगाच्या प्रतिबंधासाठी केव्हा केव्हा बीजप्रक्रिया हाच रामबाण उपाय असतो व नंतर रासायनिक बुरशीनाशकाच्या फवारण्या करणे हे चुकीचे ठरते.
- याव्यतिरिक्त काही पिकात उगवण चांगली करणे पेरणी सुलभ करणे किंवा बियाण्याची सुप्तावस्था कमी करणे या व इतर कारणासाठी बीजप्रक्रिया केली जाते.

### आगामी खरीप हंगामात प्रमुख खरीप पिकात कोणत्या रासायनिक बुरशीनाशकाची, जैविक बुरशीनाशकाची व किटकनाशकाची व कशा प्रमाणात बीजप्रक्रिया करावी?

**सोयाबीन:** सोयाबीन पिकात मूळ आणि खोडसड, कॉलर रॉट, शेंगवरील करपा, पानावरील बुरशीजन्य ठिपके या सर्व रोगाच्या प्रतिबंध करता कारबॉक्झिन ३७.५ टक्के + थायरम ३७.५ टक्के या मिश्र बुरशीनाशकाची तीन ग्रॅम प्रति किलो बियाण्यास या प्रमाणात बीजप्रक्रिया करून घ्यावी. तसेच सोयाबीन वरील खोडमाशीच्या प्रतिबंधासाठी थायमिथोक्झिन ३० टक्के या किटकनाशकाची चार मिली प्रति ३० किलो बियाण्यास या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी.

**तुर:** तुर या पिकात मर रोगाच्या प्रतिबंधासाठी कारबॉक्झिन ३७.५ टक्के + थायरम ३७.५ टक्के याविषयी बुरशीनाशकाची तीन ग्रॅम प्रति किलो बियाण्यास या प्रमाणात प्रथम बीज प्रक्रिया करावी नंतर पंधरा ते वीस मिनिटानंतर ट्रायकोडर्मा व्हिरीडी जैविक बुरशीनाशकाची दहा ग्रॅम प्रति किलो बियाण्यास याप्रमाणे बीजप्रक्रिया करून घ्यावी.

**उडीद व मुग:** या पिकात मूळकुजव्या रोगाचा प्रतिबंधासाठी ट्रायकोडर्मा व्हिरीडी या जैविक बुरशीनाशकाची चार ग्रॅम प्रति किलो बियाण्यास या प्रमाणात बीज प्रक्रिया करून घ्यावी.

**कपाशी:** कपाशी सारख्या पिकात पेरणीपूर्वी कारबॉक्झिन १ ग्रॅम किंवा थायरम तीन ग्रॅम या प्रमाणात घेऊन अनु जीवी करपा या रोगाच्या प्रतिबंधासाठी बीजप्रक्रिया करावी. कपाशी पिकात मावा पांढरी माशी तुडतुडे या किडीच्या प्रतिबंध करता थायमिथोक्झिन ३० टक्के या किटकनाशकाची चार मिली प्रति किलो बियाण्यास या प्रमाणात बीजप्रक्रिया करून घ्यावी.

**ज्वारी:** ज्वारीवरील खोडमाशी च्या प्रतिबंध करण्याकरिता इमिडाक्लोप्रिड ४८ % बारा मिली प्रति किलो बियाण्यास या प्रमाणात बीज प्रक्रिया व नंतर पंधरा दिवसांनी क्विनॉलफॉस २५ % प्रवाही २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणीची शिफारस करण्यात आली आहे. ज्वारीवरील दाण्यातील बुरशी या रोगाचा प्रतिबंध करण्यासाठी थायरम ७५ % डब्ल्यू एस तीन ग्रॅम प्रति किलो बियास या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी.

(संपर्क: +९१ ९५२७६७५१०३)

★ ★ ★